SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
E-mail.: appointment.a@unishivaji.ac.in, appointment.b@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004
महाराष्ट्र
फोन : ईपीबीएक्स – 2609000, 0231- 2609102,2609103

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/554 दि. 31 जूलै 2024

# परिपत्रक

**विषय :– स्थगित करण्यात आलेल्या परीक्षा दि. 01 ऑगस्ट 2024 पासून आयोजित करण्यात येत असल्याबाबत.**

महोदय/महोदया,

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल, २०२४ सत्रातील दि. २२ जूलै २०२४ पासूनच्या विविध अभ्यासक्रमाच्या ( बी. टेक., आर्किटेक्चर, विधी, फार्मसी) परीक्षा शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये उद्‌भवलेल्या पूरपरिस्थतीच्या पार्श्वभूमीवर स्थगित करण्यात आलेल्या होत्या. सद्यस्थितीत पुरपरिस्थितीमध्ये सतत चढ उतार होत आहे. तथापि बहुतांशी विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक व रोजगाराच्या संधी गमावण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यापीठाने नियोजित केलेल्या परीक्षा विहीत वेळेत पार पाडणे अत्यावश्यक आहे.

सदर स्थगित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. ०१ ऑगस्ट, २०२४ पासून आयोजित करण्यात येत असून या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

**तथापि, उद्‌भवलेल्या पूरपरिस्थितीमुळे काही विद्यार्थी परीक्षेस बसू शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास तात्काळ कळविण्यात यावे. तसेच अशा विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती विहीत नमूण्यात संबंधीत महाविद्यालयांनी https://forms.gle/58FiJ7GVk13q5vpR7 या Google Link मध्ये भरावी. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा यथावकाश शिवाजी विद्यापीठ कॅम्पस मध्ये आयोजित करण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयामार्फत प्राप्त होईल अशाच विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.**

सदरचे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे.

( डॉ. अजितसिंह जाधव)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

1. मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख/समन्वयक, संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/विद्यापीठातील अधिविभाग
2. मा. कुलगुरूसो यांचे कार्यालय
3. मा. प्र–कुलगुरूसो यांचे कार्यालय
4. मा. कुलसचिवसो यांचे कार्यालय
5. मा. प्र. संचालक, संगणक केंद्र
6. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
7. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
8. जनमाहिती अधिकारी – प्रसिध्दीसाठी

D/March 2024 Exam/Letter1